नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - २ रे | Year - 2nd | अंक - २७९ | Issue - 279 | वार मंगळवार दि. २५ फेब्रुवारी २०२५ | Blow- Tuesday Date 25 February 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com | वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ | Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये | Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 | ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

## थोडक्यात...



### दिल्ली विधानसभा अध्यक्षपदी विजेंद्र गुप्ता

नवी दिल्ली : तीन वेळा नवडून आलेले भाजप आमदार विजेंद्र गुप्ता यांची सोमवारी दिल्ली विधानसभा अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी विधानसभा अध्यक्षपदी निवड करण्यात आली. गुप्ता रोहिणी मतदारसंघातील आमदार आहेत. गुप्ता यांच्या निवडीनंतर सत्ताधारी आणि विरोधकांनी केलेल्या प्रचंड घोषणाबाजीमुळे सभागृहाचे काम काज १५ मिनिटांसाठी तहकूब करावे लागले. यावेळी आम आदमी पक्षाने (आप) भाजप 'दलित-शीखविरोधी' असल्याची टीका केली.

अध्यक्षपद निवडणुकीसाठी भाजपने दोन प्रस्ताव सादर केले होते. एक प्रस्ताव मुख्यमंत्री रेखा गुप्ता तर दुसरा कॅबिनेट मंत्री रविंद्र इंद्राज यांनी सादर केला.या प्रस्तावाला मंत्री मनजिंद-रसिंह सिरसा आणि प्रवेश वर्मा यांनी पाठिंबा दिला.हे दोन्ही प्रस्ताव आवाजी मतदानाने पारित करण्यात आले. हंगामी सभापती अरविंदरसिंह लवली यांच्या नेतृत्वात निवडणूक करण्यात आली. या निवडीनंतर मुख्यमंत्री रेखा गुप्ता यांनी गुप्ता यांचे अभिनंदन केले. तथापि, विरोधी पक्षनेत्या आतिशी यांनी गुप्ता यांना शुभेच्छा देताना निराशा व्यक्त केली.

# ९.८ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात २२ हजार कोटी

## 'पीएम किसान योजने'चा १९वा हप्ता केला जारी



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भागलपूर : पंतप्रधान नरेंद्र म ोदीर्ंीीपस यांनी सोमवारी पीएम किसान योजनेचा १९वा हप्ता जारी केला. यासह देशभरातील ९.८ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यांम ध्ये २२ हजार कोटींहून अधिक रुपये हस्तांतरित करण्यात आले. या वेळी पंतप्रधानांनी बिहारमध्ये अनेक प्रकल्पांची पायाभरणीदेखील केली.

पंतप्रधान किसान सन्मान निधी (पीएम-किसान) योजनेचा १९ वा हप्ता हस्तांतरित केल्यानंतर भागल-पूर येथील मेळाव्याला संबोधित करताना, पंतप्रधानांनी शेतकऱ्यांच्या कल्याणासाठी आणि बिहारच्या विकासासाठी एनडीए सरकारच्या वचनबद्धतेवर भर दिला.

या वेळी त्यांनी 'मखाना' (फॉक्स नट) बोर्ड स्थापन करण्याची घोषणा केली. तसेच केंद्र सरकार राज्यात चार नवीन पूल बांधण्यासाठी ११०० कोटी रुपयांची तरतूद करणार असल्याचेदेखील त्यांनी सांगितले.

या कार्यक्रमाला बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार, केंद्रीय मंत्री शिवराजसिंह चौहान यांनीही संबोधित केले.

राजदप्रमुख लालूप्रसाद यांनी म हाकुंभसंदर्भात केलेल्या टिप्पणीवरून पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी हल्लाबोल केला. हिंदू धर्माची थट्टा करणाऱ्या 'जंगलराज'च्या नेत्यांना बिहारची जनता कधीच माफ करणार नाही, असे ते म्हणाले. पंतप्रधानांनी लालू यांचे नाव न घेता टीका केली. काही दिवसांपूर्वीच लालू यांनी महाकुंभ अर्थहीन असल्याची टीका केली होती.

प्रयागराजमध्ये एकतेचा महाकुंभ सुरू असून आत्तापर्यंत संपूर्ण युरोपम धील एकूण लोकसंख्येपेक्षा अधिक लोकांनी महाकुंभमध्ये स्नान केले आहे.

महाकुंभासाठी बिहारम धूनही भाविक येत आहेत मात्र जंगलराजचे हे लोक महाकुंभालाच शिवीगाळ करीत असल्याची व वाईट बोलत असल्याची टीका पंतप्रधानांनी केली.

**निवडणूक व्यवस्थापनासाठी पंतप्रधान बिहारमध्ये तेजस्वी**

राजद नेते तेजस्वी यादव यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या बिहार दौऱ्यावर टीका केली. या वर्षअखेरीस होणाऱ्या विधानसभा निवडणुकांच्या व्यवस्थापनासाठी सूचना जारी करण्याच्या उद्देशाने बिहारला येत असल्याचे ते म्हणाले. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर काही सूचना देण्यासाठी मोदी भागलपू-रला येत असून आगामी काळात त्यांना बिहार आणि बिहारी जनतेची काळजी असेल, असा टोमणाद-ेखील त्यांनी हाणला.



# एसटी बस कर्मचारी संपावर जाणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : गेल्या अनेक कालावधीपासून एसटी कर्मचाऱ्यांच्या आर्थिक मागण्या प्रलंबित आहेत. त्यांची पूर्तता होण्यासाठी एसटी महामंडळातील सर्व कामगार, कर्मचारी ५ मार्च रोजी सर्व आगार, विभागाच्या मुख्यद्वारावर आंदोलन करणार आ-हेत. या निदर्शने आंदोलनाची दखल एसटी महामंडळ, राज्य सरकारने न घेतल्यास, त्यानंतर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा महाराष्ट्र स्टेट ट्रान्सपोर्ट कामगार संघटनेकडून दिला आहे. परिणामी, एसटी कर्मचाऱ्यांचे आंदोलनाचा मोठे स्वरूप प्राप्त झाल्यास होळीच्या कालावधीत वाहतुकीवर परिणाम होण्याची शक्यता आहे.

राज्य परिवहन (एसटी) म हामंडळाकडे प्रलंबित असलेली विविध स्वरूपाची थकबाकी एसटी कामगारांना देण्याबाबत वारंवार म ागणी करूनही ती मिळत नसल्याम ुळे कामगारांमध्ये नाराजी निर्माण झाली आहे. ती दूर करण्यासाठी व कामगारांना देय असलेल्या वाढीव वेतनाच्या थकबाकीमध्ये खंड पडू नये यासाठी १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२४ या कालावधीची देय होणारी थकबाकी त्वरीत देण्यात यावी. तसेच २०१८ सालापा-सूनची महागाई भत्याची थकबाकी कामगारांना अदा करण्याचा निर्णय न्यायालयाने दिला आहे. ही थकबाकी अद्याप कामगारांना मि ळालेली नाही. तसेच घरभाडे भत्त्याचा दर, वेतनवाढीचा दर कमी करण्यात आला आहे. एसटी कामगारांना वाढीव ५० टक्के महागाई भत्ता लागू करण्याबाबत वारंवार मागणी करूनही सुमारे १ वर्षाचा कालावधी उलटून गेलेला असतानाही ५० टक्के महागाई भत्ता कामगारांना लागू केलेला नाही. हा महागाई भत्ता थकबाकीसह काम गारांना मार्च २०२५ च्या वेतनापासून लागू करण्यात यावा, अशी मागणी संघटनेने केली आहे.

# मजुरांच्या सुटकेची आशा धूसर; पाणी, चिखलामुळे बचाव कार्यात अडथळे; आठ जण अडकलेलेच

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

हैदराबाद : तेलंगणातील श्रीशैलम डावा किनारा कालवा (एसएलबीसी) प्रकल्पाच्या खचलेल्या बोगद्यात अडकलेल्या आठ मजुरांच्या सुटकेची आशा धूसर झाली आहे.



बचाव पथकाचे कार्य सुरू असतानाच पाणी आणि चिखल गळतीमुळे प्रचंड पेच निर्माण झाला आहे. बोगदा खचल्यानंतर शनिवारपासून आठ मजूर येथे अडकलेले आहेत. यादरम्यान, चिखल साचल्यामुळे पीडितांपर्यंत पोहोचण्यासाठी तूर्तास कोणतेही तंत्रज्ञान नसल्याची माहिती एनडीआरएफच्या १०व्या बटालियनचे कमांडंट प्रसन्न कुमार यांनी दिली.

दरम्यान, परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी नौदल, लष्कर आणि इतर संघटनांसोबत प्रदीर्घ बैठक घेतल्यानंतर, घटनास्थळी उपस्थित कोणताही तज्ज्ञ चिखलाची भिंत ओलांडून अडकलेल्या लोकांपर्यंत कसे पोहोचायचे हे सुचवू शकले नाही. शनिवारी सकाळी बोगद्याच्या १३.५ किलोमीटर आत छताचा एक भाग कोसळून सुमारे ६० तास उलटले आहे.

चिखलात तीक्ष्ण धातू, काँक्रीटचे तुकडे अन्य सामग्री असल्याची माहितीही त्यांनी दिली. जो कोणी या बोगद्यात जाईल तो निश्चितच जखमी होईल, अशी शंका त्यांनी व्यक्त केली.

एक 'रॅट वर्कर' मदतीला आला परंतु तो कोरड्या परिस्थितीतच काम करू शकतो, असे ते म्हणाले.

बोगद्यात चिखल-पाणी मिश्रणाच्या जाड भिंतीचे संकट असून सध्या आमच्याकडे असे कोणतेही तंत्रज्ञान नाही जे आम्हाला ही मातीची भिंत ओलांडून पीडितांपर्यंत पोहोचण्यास मदत करू शकेल, असे कुमार म्हणाले. तसेच अद्याप अडकलेल्या लोकांशी संपर्क स्थापित करू शकलो नसल्याची माहितीदेखील त्यांनी दिली. येथे ५८४ कुशल कर्मचाऱ्यांच्या पथकाने निरीक्षणही केले होते, परंतु यश आले नाही.

# शेतकऱ्यांना ३ हजारांची वाढीव आर्थिक मदत; मुख्यमंत्र्यांची घोषणा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नागपूर : शेतकऱ्यांना दिल्या जाणाऱ्या 'नमो किसान सन्मान निधी'म धील राज्याचा वाटा तीन हजार रुपयांनी वाढविण्याचे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी दिले. यामुळे केंद्राचे सहा हजार आणि राज्याचे नऊ हजार असे १५ हजार रुपये शेतकऱ्यांना दरवर्षी मिळतील, असे ते म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बिहारच्या भागलपूरमध्ये 'प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजने' १९ व्या हप्त्याचे वितरण करण्यात आले. या वितरणाचा राज्यस्तरीय कार्यक्रम मुख्यमंत्री फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वनामती येथील सभागृहात घेण्यात आला. यावेळी राज्याचे कृषी राज्यमंत्री ॲड. आशीष जयस्वाल, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी आदी उपस्थित होते. यावेळी मुख्यमंत्री म्हणाले, की प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेद्वारे शेतकऱ्यांना



अडचणीच्या काळात आर्थिक मदत मिळत आहे. योजनेंतर्गत केंद्र शासन वर्षाला शेतकऱ्यांच्या बँक खात्यात ६ हजार रुपये वितरित करते. तर राज्य शासनाच्या वतीने 'नमो किसान सन्म ान निधी योजनेद्वारे' वर्षाकाठी ६ हजार रुपयांची मदत देण्यात येते. राज्य शासन या निधीत ३ हजार रुपयांनी वाढ करणार असून त्यामुळे शेतकऱ्यांना वर्षाला १५ हजार रुपयांचे अर्थसहाय्य मिळणार आहे. या कार्यक्रम ापूर्वी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते वनामती परिसरातील कृषी प्रदर्शनीचे उद्घाटन करण्यात आले. त्यांनी प्रदर्शनीला भेट देऊन विविध दालनांची पाहणी केली तसेच मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रगतिशील शेतकऱ्यांचा गौरव करण्यात आला.

**तिजोरीवर आणखी बोजा**

लाडकी बहीण, लाडका भाऊ, शेतकऱ्यांना मोफत वीज अशा निवडणूकपूर्व लोकप्रिय घो-षणांमुळे राज्याच्या तिजोरीवर ताण येऊन खर्चात कपात करावी लागली असताना शेतकऱ्यांच्या अनुदानात तीन हजारांनी वाढ केल्याने तिजोरीवरील आणखी बोजा पडणार आहे. त्याम ुळे वित्तीय तूट आणखी वाढण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. चालू आर्थिक वर्षात ७० टक्के खर्च करण्याचे आदेश वित्त विभागाने सर्व खात्यांना दिले आहेत.

**भारत-न्यूझीलंड सेमीफायनल**

**३० वर्षांनंतर यजमानपद मिळवणाऱ्या संघालाच बाहेरचा रस्ता**

# पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफीतून बाहेर; न्यूझीलंडच्या बांगलादेशवरील विजयाने शिक्कामोर्तब

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नवी दिल्ली : चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद असलेल्या पाकिस्तानचा संघ स्पर्धेच्या अवघ्या दिवसांतच स्पर्धेतून बाहेर झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीतील सहावा सामना न्यूझीलंडविरूद्ध बांगलादेश यांच्यात खेळवला गेला. न्यूझीलंड संघाने बांगलादेशचा ६ विकेट्सने पराभव केला. पण न्यूझीलंडच्या या विजयासह पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधून बाहेर झाला. तर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अ गटातून भारत आणि न्यूझीलंड हे संघ चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलसाठी पात्र ठरले आहेत. भारत आणि न्यूझीलंडने सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत थेट सेमीफायनल गाठली आहे.

तब्बल ३० वर्षांनंतर पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळाली होती. १९९६ मध्ये झालेल्या विश्वचषकाचे यजमानपद पाकिस्तानकडे हो-ते. त्यानंतर थेट आता २०२५ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजम ानपद पाकिस्तानला मिळाले होते. पाकिस्तानने आयसीसी स्पर्धेचे यजम ानपद मिळावे यासाठी बरेच प्रयत्न केले होते.

पण घरच्या मैदानावर होणाऱ्या सामन्यांचा पाकिस्तानने बिलकुल फायदा करून घेतला नाही आणि पहिल्या दोन सामन्यात पराभूत होत स्पर्धेतील आपले आव्हान संपुष्टात आणले.

इतकंच नव्हे तर पाकिस्तानचा संघ २०१७ मधील चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता संघ होता, म्हणजेच या स्पर्धे तील गतविजेता संघ होता. पण पाकिस्तान आता गट सामन्यांतूनच बाहेर झाला आहे. पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ६० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. तर दुसऱ्या सामन्यात भारताकडून ६ विकेट्स आणि ४५ चेंडू राखून पराभव पत्करावा लागला होता. सलग दोन सामन्यांमधील पराभवाने आता पाकिस्तान आणि बांगलादेशचा संघ गट सामन्यांमधूनच स्पर्धेतून बाहेर झाला आहे.

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या ब गटात दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश आहे. या सर्व संघांनी आतापर्यंत १-१ सामने खेळले आहेत. ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ विजयी झाले आहेत. त्याचबरोबर इंग्लंड आणि अफगाणिस्तानला



पराभवाला सामोरे जावे लागले आहे. २५ फेब्रुवारीला ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना होणार आहे. आता कोणता संघ सलग दुसरा विजय मिळवतो यावर सर्वांचं लक्ष असणार आहे.

बांगलादेश न्यूझीलंड सामन्याची किवी संघाने नाणेफेक जिंकत प्रथम गोलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. बांगलादेशच्या संघाने न्यूझीलंडविरूद्ध चांगली सुरूवात करत किवींना धक्का दिला. पण न्यूझीलंडच्या गोलंदाजांनी पुनरागमन करत बांगलादेशला बॅकफ ूटवर टाकले. बांगलादेशने ४५ धावांवर पहिली विकेट गमावली आणि त्यानंतर ठराविक अंतरासह संघाने विकेट्स गमावल्याचा फटका बसला. न्यूझीलंडकडून कर्णधार नझमुल शांतोने ९ चौकारांसह ७७ धावांची खेळी केली तर जाकेर अलीने ४५ धावांची आणि रिशाद हुसैनने २६ धावांची तर तन्झीद हसनने २४ धावांची खेळी करत संघाला २३६ धावांपर्यंत नेले.

न्यूझीलंडकडून मायकेल ब्रेसवेलने आपल्या फिरकीच्या जाळ्यात बांगलादेशी फलंदाजांना अडकवले आणि १० षटकांत २६ धावा देत ४ विकेट्स घेतल्या. तर विल्यम ओरूकने २ विकेट्स आणि हेन्री, जेमीसनने १-१ विकेट घेतली.

बांगलादेशने दिलेल्या २३६ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करण्यासाठी आलेल्या न्यूझीलंड संघाची सुरुवात काही खास झाली नाही. त्यांनी केवळ ७२ धावांत ३ विकेट गमावल्या.

यानंतर रचिन रवींद्रने शानदार फलंदाजी करत शतक झळकावून आपल्या संघाला विजयाकडे नेले. रचिन आणि कॉन्वे यांनी मॅचविनिंग भागीदारी रचली. न्यूझीलंडने हे लक्ष्य ४६.१ षटकांत ५ गडी गमावून पूर्ण केले.

कॉन्वेने ३० धावा केल्या, तर विल्यसमन ५ धावा करत बाद झाला. यानंतर रचिन रवींद्र जो चॅम्पियन्स ट्रॉफीतील पहिला सामना खेळत होता, त्याने १०५ चेंडूत १२ चौकार आणि एका षटकारासह ११२ धावा केल्या. तर टॉम लॅथमने ५ धावा केल्या, तर फिलिप्सने २१ आणि ब्रेसवेलने ११ धावा करत संघाला विजय मिळवून दिला.

दैनिक

# यश सिद्धि न्यूज



## संपादकीय....

### यजमानाचे आव्हान संपुष्टात

तब्बल ३० वर्षांनंतर पाकिस्तानला आयसीसी स्पर्धेचे यजमानपद भूषवण्याची संधी मिळाली होती. १९९६ मध्ये झालेल्या विश्वचषकाचे यजमानपद पाकिस्तानकडे होते. त्यानंतर थेट आता २०२५ च्या आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद पाकिस्तानला मिळाले होते. पाकिस्तानने आयसीसी स्पर्धेचे यजमानपद मिळावे यासाठी बरेच प्रयत्न केले होते. पण घरच्या मैदानावर होणाऱ्या सामन्यांचा पाकिस्तानने बिलकुल फायदा करून घेतला नाही आणि पहिल्या दोन सामन्यात पराभूत होत स्पर्धेतील आपले आव्हान संपुष्टात आणले. इतकंच नव्हे तर पाकिस्तानचा संघ २०१७ मधील चॅम्पियन्स ट्रॉफीचा विजेता संघ होता, म्हणजेच या स्पर्धेतील गतविजेता संघ होता. पण पाकिस्तान आता गट सामन्यांतूनच बाहेर झाला आहे. पाकिस्तानला पहिल्या सामन्यात न्यूझीलंडकडून ६० धावांनी पराभवाला सामोरे जावे लागले. तर दुसऱ्या सामन्यात भारताकडून ६ विकेट्स आणि ४५ चेंडू राखून पराभव पत्करावा लागला होता. सलग दोन सामन्यांमधील पराभवाने आता पाकिस्तान आणि बांगलादेशचा संघ गट सामन्यांमधूनच स्पर्धेतून बाहेर झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीचे यजमानपद असलेल्या पाकिस्तानचा संघ स्पर्धेच्या अवघ्या दिवसांतच स्पर्धेतून बाहेर झाला आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीतील सहावा सामना न्यूझीलंडविरूद्ध बांगलादेश यांच्यात खेळवला गेला. न्यूझीलंड संघाने बांगलादेशचा ६ विकेट्सने पराभव केला. पण न्यूझीलंडच्या या विजयासह पाकिस्तान चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ मधून बाहेर झाला. तर चॅम्पियन्स ट्रॉफीच्या अ गटातून भारत आणि न्यूझीलंड हे संघ चॅम्पियन्स ट्रॉफीच्या सेमीफायनलसाठी पात्र ठरले आहेत. भारत आणि न्यूझीलंडने सुरूवातीचे दोन्ही सामने जिंकत थेट सेमीफायनल गाठली आहे. चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ च्या ब गटात दक्षिण आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, इंग्लंड आणि अफगाणिस्तान या संघांचा समावेश आहे. या सर्व संघांनी आतापर्यंत १-१ सामने खेळले आहेत. ज्यामध्ये ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिकेचे संघ विजयी झाले आहेत. त्याचबरोबर इंग्लंड आणि अफगाणिस्तानला पराभवाला सामोरे जावे लागले आहे. २५ फेब्रुवारीला ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात सामना होणार आहे. आता कोणता संघ सलग दुसरा विजय मिळवतो यावर सर्वांचं लक्ष असणार आहे.

# भाविकांच्या भक्तीला दाद देत वटवृक्ष मंदिरात स्वामी दर्शनाचे उत्तम नियोजन

## स्वामी दर्शनानंतर पुणे येथील रहिवासी स्वामीभक्त कु. विद्याजी ईवरे यांचे मनोगत

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान हे श्री स्वामी समर्थांचे मूळस्थान आहे, त्यामुळे स्वामीभक्त हे स्वामींच्या या मूळस्थानी आवर्जून येत असतात व अत्यंत भक्ती भावाने स्वामी समर्थांच्या चरणी नतमस्तक होत असतात. ही बाब लक्षात घेऊनच मंदिर समितीचे चेअरमन महेश इंगळे यांच्या अधिपत्याखाली भाविकांच्या भक्तीला दाद देत वटवृक्ष मंदिरात स्वामी दर्शनाचे उत्तम नियोजन असल्याचे मनोगत पुणे येथील स्वामीभक्त विद्याजी ईवरे यांनी व्यक्त केले.

ते नुकतेच येथील श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरास भेट देऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले. याप्रसंगी मंदिर समितीच्या वतीने समितीचे चेअरमन महेश इंगळे यांनी कु.विद्याजी ईवरे व त्यांच्या परिवारास श्री स्वामी समर्थांचे कृपावस्त्र, प्रसाद, प्रतिमा देऊन यथोचित सन्मान केला. याप्रसंगी पुढे बोलताना विद्याजी ईवरे यांनी श्री वटवृक्ष स्वामी महाराज देवस्थान समितीचे कार्य हे अत्यंत सेवाभावी वृत्तीने चालत असल्याचे पाहून समाधान वाटले आहे. असल्याचे मनोगत ही व्यक्त केले व मंदिर समितीचे चेअरमन महेशजी मालक इंगळे यांचे आभार मानले..



## डुबेरे येथील शाहू किड्स अकॅडमीमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी:- डुबेरे येशील एन.के.वाजे फाउंडेशन संचलीत शाहू किड्स अक्डेमी विद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात संपन्न झाला. विद्येची देवता सरस्वतीचे पूजन करून कार्यक्रमाची सुरूवात करण्यात आली. विविध परीक्षेत उल्लेखनीय यश मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना बक्षिसे देवून गौरविण्यात आले.



दूधडेरी चे संचालक सुनील प्रभाकर वाजे यांनी शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना मोफत वह्या वाटप केल्या. यावेळी एन.के.फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश वाजे, उद्योजक राम वारुंगसे ,शाळेच्या प्राचार्य सोनाली माळी, ज्योती वाजे ,पालक अंजली काटे आदींसह विद्यार्थी, पालक उपस्थित होते.

## २७ फेब्रुवारी रोजी पंचायत समिती पंढरपूरची आमसभा


**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : पंचायत समिती, पंढरपूर सन २०२४-२५ ची आमसभा गुरुवार दिनांक २७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता पंढरपूर पंचायत समितीच्या प्रांगणात आयोजित करण्यात आली आहे. असे गटविकास अधिकारी सुशिल संसारे यांनी कळविले आहे.

सदरची आमसभा आमदार अभिजित पाटील यांच्या अध्यक्षतेखाली व आमदार समाधान आवताडे, आमदार राजु खरे, तसेच आमदार बाबासाहेब देशमुख यांच्या प्रमुख उपस्थित आयोजित केलेली आहे.

या आमसभेसाठी प्रत्येक विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित राहणार असल्याची माहितीही गटविकास अधिकारी सुशिल संसारे यांनी दिली.

## निफाड शहरातील रस्त्यालगत असणाऱ्या अतिक्रमणाविरोधात संयुक्त बैठक



**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

निफाड/प्रतिनिधी : निफाड शहरातील अतिक्रमणाविरोधात नुकतेच निफाड नगरपंचायत येथे संयुक्त बैठक घेण्यात आली या बैठकीत बांधकाम विभागाचे पि.आर. घोडे ,निफाड नगरपंचायतचे उपनगराअध्यक्ष अनिल पाटील कुंदे, मुख्याधिकारी अमोल चौधरी, निफाड पोलीस ठाण्याचे नितीन सांगळे आदी मान्यवर उपस्थित होते.. याप्रसंगी

निफाड शहरातील पिंपळगाव बसवंत ते नैताळे या रस्त्यावर चौफुली ते बस स्थानक दरम्यान अनेक लोकांनी उंच पाल टाकून आपली दुकाने थाटले असून त्यामुळे पाठीमागे असणाऱ्या दुकानदारांच्या.. व्यवसायावर त्याचा परिणाम होत असल्याचे सांगितले,आहे, याच रस्त्यावर शहरातील सर्वात मोठ्या दोन शाळा असून रस्त्याच्या कडेला दुचाकी चार चाकी वाहने उभी केली जात असल्याने त्याचा विद्यार्थ्यांना व नागरिकांना येण्या जाण्यासाठी त्रास सहन करावा लागत आहे, रस्त्याच्या दोन्ही बाजूने अतिक्रमण झाल्याने अपघाताचे प्रमाणही वाढले आहे, या संयुक्त बैठकीत उपस्थित नागरिकांनी निफाड शहरातील अतिक्रमणाबाबतच्या अनेक समस्या या वेळी मांडल्या.या प्रसंगी निफाड नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष अनिल पाटील कुंदे म्हणाले की सात मार्च च्या आत निफाड शहरातील अतिक्रमण काढले नाही तर निफाड चौफुली येथे सर्वांना सोबत घेऊन रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा यावेळी त्यांनी दिला . याप्रसंगी निफाड शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज शॉपिंग सेंटर मधील गाळेधारक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ७ मार्चच्या आत अतिक्रमण न काढल्यास रास्ता रोको आंदोलन करणार : अनिल पा. कुंदे

मी प्रथम नागरिक असून नागरिकांच्या सहकार्याने मी एक पर्यंत आलो आहे नागरिकांच्या अडचणी खऱ्या अर्थाने शासन प्रतिनिधी सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिकारी यांचे कडून सुटत नसतील तर मी नागरिकांबरोबर असणार आहे नागरिक म्हणून माझी जबाबदारी आहे लोकांना न्याय मिळवून देण्यासाठी मी पुढे असले पाहिजे ही जनतेची भावना आहे

**– अनिल पा. कुंदे (उपनगराध्यक्ष नगर पंचायत)**

## सोमनाथ गिरी यांना कविवर्य कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार जाहीर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सिन्नर/प्रतिनिधी : दहिवाडी तालुका सिन्नर येथील भूमिपुत्र व डुबेरे येथील जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयातील उपशिक्षक सोमनाथ कुसुमबाई लक्ष्मण गिरी यांना कविवर्य कुसुमाग्रज शिक्षक सन्मान पुरस्कार जाहीर झाला आहे .

शैक्षणिक क्षेत्रात, मराठी भाषेबरोबर विविध कला,सामाजिक, सांस्कृतिक व राष्ट्रीय देश हिताच्या संवर्धनासाठी आणि विद्यार्थी सर्वांगीण विकासासाठी राबवत असलेल्या उपक्रमाची दखल घेऊन त्यांना हा पुरस्कार झाला आहे अशी माहिती कार्यक्रमाचे आयोजक तथा नाशिक जिल्हा मराठी अध्यापक संघाचे जिल्हाध्यक्ष सुरेश सलादे यांनी दिली आहे.

कविवर्य कुसुमाग्रज यांची जयंती व जागतिक मराठी भाषा गौरवदिनी म्हणजे गुरुवार दि.२७ फेब्रुवारी रोजी शिरवाडे वणी ता-निफाड येथे विविध मान्यवरांच्या हस्ते पुरस्कार वितरणाचा कार्यक्रम संपन्न होणार आहे.



पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल मराठा विद्या प्रसारक समाज संस्थेचे सरचिटणीस ड. नितीनजी ठाकरे, तालुका संचालक कृष्णाजी भगत, संस्थेचे शिक्षणाधिकारी डॉ. भास्करराव ढोके, कार्यालयीन अधीक्षक दत्तात्रय लोंढे, शालेय समितीचे अध्यक्ष नारायणशेठ वाजे ,उच्च माध्यमिक समितीचे अध्यक्ष विठ्ठल तात्या वामने,पालक शिक्षक संघाचे उपाध्यक्ष सोमनाथ वारुंगसे, विद्यालयाचे मुख्याध्यापक रामदास वाजे ,पोलीस पाटील रामदास वारुंगसे , अरुणशेठ वारुंगसे,अशोक गवळी, शरद माळी आदींसह शिक्षक ,शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी कौतुक केले.हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सर्व स्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### लोककल्याणासाठी पत्रकारितेचा आग्रह धरा : अमृता फडणवीस

## आपण निसर्गाचे देणे लागतो याचे भान ठेवा : जॅकी श्रॉफ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई/ सुधाकर रणदिवे : आपण निसर्गाचे काहीतरी देणे लागतो, तसे काम पुढच्या पिढीसाठी करावे, असे आवाहन प्रसिद्ध सिनेअभिनेते जॅकी श्रॉफ यांनी व्यक्त केले, तर सर्व पत्रकारांनी लोककल्याणासाठी पत्रकारिता करावी, असे मत अमृता फडणवीस यांनी मांडले. मुंबई येथे 'महाराष्ट्र भूषण २०२४' व 'व्हॉईस ऑफ मीडिया' पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२४ सोहळा, तसेच नवनिर्वाचित जिल्हाध्यक्षांचा सन्मान व पदग्रहण सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी ते बोलत होते.



**व्यंकटेश जोशी, सीमा सिंग, वैभव वानखडे, डॉ. विजय दहिफळे, शिवाजी बनकर यांना 'महाराष्ट्र भूषण' तर, दिलीप वैद्य, सुरज कदम, संदीप खडेकर, बाळासो पाटील, वृषाली पाटील यांना जर्नालिझम अवॉर्ड प्रदान**

महाराष्ट्र राज्याला अभिमान वाटावा असे उल्लेखनीय कार्य करणाऱ्या पाच जणांना 'महाराष्ट्र भूषण २०२४' हा सन्मान प्रदान करण्यात येणार आहे. यामध्ये खालील मान्यवरांचा समावेश होता. व्यंकटेश जोशी, सीमा सिंग, वैभव वानखडे, डॉ. विजय दहिफळे, शिवाजी बनकर, तर पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२४ ने दिलीप वैद्य, सुरज कदम, संदीप खडेकर, बाळासो पाटील,वृषाली पाटील या पाच जणांना 'व्हॉईस ऑफ मीडिया' पॉझिटिव्ह जर्नालिझम अवॉर्ड २०२४ ने सन्मानित करण्यात आले.

मंगलप्रभात लोढा (मंत्री, कौशल्य रोजगार, उद्योजकता व नावीन्यता), हेमंत पाटील (विधान परिषद सदस्य व अध्यक्ष, हरिद्रा संशोधन व प्रशिक्षण केंद्र), स्वामी श्रीकंठानंद ,प्रवर्तक (जागृत नाशिक जागृत भारत जागृत विश्व),

डॉ. शुभ विलास (लाईफस्टाईल कोच, कथाकार आणि लेखक), ब्रिजेश सिंह (महासंचालक व सचिव, माहिती व जनसंपर्क), अशोक काकडे (जिल्हाधिकारी, सांगली), पाशा पटेल, राजश्री पाटील (अध्यक्ष, गोदावरी समूह व पुरस्कार निवड प्रक्रिया प्रमुख), विशाल पाटील (संपादक, लोकशाही), आशितोष पाटील (संपादक, जय महाराष्ट्र), गगन मलहोत्रा, प्रदेशाध्यक्ष (इंटरनॅशनल चीफ'व्हॉईस ऑफ मीडिया'), अनिल म्हस्के (प्रदेशाध्यक्ष 'व्हॉईस ऑफ मीडिया') आदी मान्यवर व्यासपीठ उपस्थित होते. अशोक काकडे यांनी उपस्थित सर्व पत्रकार यांना कर्तव्यपणाची दीक्षा दिली. 'आवाज विश्वातल्या पत्रकारांचा' या पुस्तकाचे प्रकाशन, 'विजयी भव' आणि 'जिंकलेले योद्धे' या पुस्तकांच्या मराठी, हिंदी, इंग्लिश, कव्हरचे प्रकाशन, मासिक 'नयन अक्षर'चे प्रकाशन मान्यवरांच्या

हस्ते करण्यात आले. पत्रकार आणि पत्रकारिता या विषयांवर कार्यक्रमात चिंतन झाले.






## स्वेरीमध्ये 'मातृभाषा दिन' साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : 'मराठी भाषा ही केवळ संवाद साधण्याचे साधन नसून महाराष्ट्राच्या सांस्कृतिक, ऐतिहासिक, सामाजिक जीवनाचा तो एक महत्वाचा भाग आहे. सध्या सर्वत्र इंग्रजी भाषेचे लोण पसरले असले तरी जागतिक पातळीवर ती ज्ञानभाषा आहे. मात्र आपल्या प्रेम, भावना, आनंद, दुखः, प्रसन्नता, निराशा, विश्वास या भावना व्यक्त करायच्या असल्यास मातृभाषेद्वारे त्या अधिक प्रभावीपणे प्रकट करता येतात म्हणून मातृभाषेचा सन्मान करणे हे आपले आद्य कर्तव्य आहे.' असे प्रतिपादन प्रथम वर्ष अभियांत्रिकीचे विभागप्रमुख डॉ.यशपाल खेडकर यांनी केले.

केंद्रीय मंत्रालयाच्या 'मिनिस्ट्री ऑफ एज्युकेशन' यांच्या आदेशाने व ऑल इंडिया कौन्सिल फॉर टेक्निकल एज्युकेशन (एआयसीटीई) यांच्या सूचनेनुसार 'मातृभाषेच्या माध्यमातून बुद्धिमत्ता आणि क्षमता विकास' अंतर्गत गोपाळपूर (ता. पंढरपूर) येथील स्वेरी तथा श्री. विठ्ठल एज्युकेशन अँड रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे यांच्या मार्गदर्शनाखाली स्वेरीच्या भव्य मैदानावरील हिरवळीवर 'जागतिक मातृभाषा दिन' साजरा करण्यात आला. याप्रसंगी डॉ.यशपाल खेडकर हे मातृभाषा दिनाचे महत्व विशद करत होते. डॉ. खेडकर पुढे म्हणाले की, 'युनो ने जागतिक मातृभाषा दिन का साजरा करावा याबाबत स्पष्ट केले असून तंत्रज्ञान युगातून भौगोलिक दरी कमी होत आहे. विविध ठिकाणी शिक्षण घेतलेली विविध संस्कृतीतील माणसे कामानिमित्त एकत्र येतात तेव्हा संवादासाठी ज्ञानभाषा म्हणुन इंग्रजी वापरली जाते परंतु आपल्या प्रांतातून आपल्या माणसांशी ज्या भाषेतून आपण बोलतो तिला मातृभाषा म्हणतात. कोसावर बोलीभाषा बदलते, विविध देश, विविध राज्य, विविध प्रांतामध्ये डोकावल्यास त्या भागातील कोणते लोक कशी भाषा वापरतात यावरून त्यांची मातृभाषा ओळखता येते. यासाठी बहुभाषांना प्रोत्साहन देण्यासाठी मातृभाषा दिन साजरे करतात.' असे सांगून त्यांनी मातृभाषेसंदर्भात अनेक उदाहरणे दिली. यावेळी अभियंता योगगुरू अशोक ननवरे, स्वेरीचे संस्थापक सचिव व अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.बी. पी.रोंगे, बी.फार्मसीचे प्राचार्य डॉ. मिथुन मणियार, डिप्लोमा इंजिनिअरिंगचे प्राचार्य डॉ. एन.डी. मिसाळ, डी.फार्मसीचे प्राचार्य प्रा. सतिश मांडवे, उपप्राचार्या डॉ. मिनाक्षी पवार, विद्यार्थी अधिष्ठाता डॉ.एम. एस. मठपती, सर्व अधिष्ठाता, सर्व विभागप्रमुख, स्वेरी अंतर्गत असलेल्या चारही महाविद्यालयांतील प्राध्यापकवर्ग, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी आदी उपस्थित होते. डॉ. नीता कुलकर्णी यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय :** सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय :** प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

## थोडक्यात...

### किरकोळ कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण ; पाच जणांवर गुन्हा

सोलापूर (प्रतिनिधी) किरकोळ कारणावरून लोखंडी रॉडने मारहाण केल्याप्रकरणी पाच जणांविरुद्ध एम आयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही घटना २१ फ ेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास शिवगंगा नगर भाग ४ कृष्णा मंगल कार्यालय जवळ नई जिंदगी येथे घडली.याप्रकरणी दशरथ राणुसिंग पुणेवाले (वय-४२,रा.शिवगंगा नगर भाग ४) यांनी एमआयडीसी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे.त्यांच्या फिर्यादीवरून यादव भालेकर,लखन भालेकर,आदित्य कांबळे,आर्यन कांबळे,अभिजीत भालेकर (सर्व.रा. शिवगंगा नगर,नई जिंदगी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की,फिर्यादी हे कामानिमित्त बाहेर जात असताना त्यांच्या घराजवळ लावलेली दुचाकी काढत होते.त्यावेळी वरील संशयित आरोपी यांनी फिर्यादीस बोलावून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली.त्यांच्यापैकी आदित्य कांबळे याने लोखंडी रॉडने फिर्यादीच्या हाताच्या बोटावर मारल्याने त्यांच्या हाताच्या करंगळीला मार लागून दुखापत झाली असल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.पुढील तपास पोसई.गाढवे हे करीत आहेत.

# शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केंद्र सरकार कटीबद्ध : रामदास आठवले

## कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथे किसान सन्मान समारोह कार्यक्रम संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर, दिनांक २४:- शेतकऱ्यांच्या उन्नतीसाठी केंद्र सरकार कटीबद्ध आहे. सर्वसामान्य जनतेला सामाजिक न्याय देणे शेतकऱ्याचे कल्याण करण्यासाठी केंद्र सरकार प्राथमिकता देत आहे. महिला शेतकऱ्यांची उपस्थिती त्यांचे अधिक योगदान असल्याचे दर्शवते असे प्रतिपादन केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचे राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले. ते शबरी कृषी प्रतिष्ठान सोलापूर संचलित कृषी विज्ञान केंद्र सोलापूर येथे आयोजित किसान सन्मान समारोह कार्यक्रमांमध्ये बोलत होते.

यावेळी व्यासपीठावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, शबरी कृषी प्रतिष्ठान सोलापूरचे अध्यक्ष प्रदीप गायकवाड, राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूरचे संचालक डॉ. राजीव मराठे, श्री. राजाभाऊ सरवदे, कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे उपस्थित होते.

सन्मान निधीच्या एकोणिसाव्या हप्त्याचे वाटप माननीय पंतप्रधान यांच्या शुभहस्ते ऑनलाइन पद्धतीने करण्यात आले. सोलापूर येथे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शबरी कृषी प्रतिष्ठान सोलापूरचे अध्यक्ष माननीय श्री प्रदीप गायकवाड यांनी कै. ज्योतीराम गायकवाड यांच्या

**पीएम किसान च्या १९ व्या हप्त्याचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हस्ते वितरण**

प्रयत्नातून हे कृषी विज्ञान केंद्र उभे आहे ते शेतकऱ्यांना तांत्रिक माहिती देत आहे. सध्या शेतीमध्ये खर्च कमी करणे हे सर्वात मोठे आव्हान आहे यासाठी सेंद्रिय शेतीची वाट धरावी लागेल असे प्रतिपादन श्री. आठवले यांनी केले.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी मान्यवरासह कृषी प्रदर्शनाची पाहणी केली. यावेळी कृषी विज्ञान केंद्र सोलापूरच्या महाराजी प्रशिक्षणार्थींनी उत्पादित केलेले सेंद्रिय अंजीर, हुरडा, श्रीखंड, जात्यावर केलेली तुरदाळ तसेच ज्वारीचे विविध प्रक्रियायुक्त पदार्थ, नाचणीची बिस्किटे इत्यादींची पाहणी केली. याबरोबरच महिला शेतकरी उत्पादक कंपनी बोरामणी तसेच सेंद्रिय नुट्रीशनल मॉल याबद्दल मंत्री महोदयांनी सखोल अशी माहिती घेतली.

प्रास्ताविकामध्ये कृषी विज्ञान केंद्र सोलापूरचे वरिष्ठ शास्त्रज्ञ तथा प्रमुख डॉ. लालासाहेब तांबडे यांनी किसान सन्मान निधी योजनेविषयी सविस्तर अशी माहिती उपस्थित शेतकऱ्यांना दिली. तसेच कार्यक्रमाच्या आयोजना मागील हेतू स्पष्ट केला.

राष्ट्रीय डाळिंब संशोधन केंद्र सोलापूरचे संचालक डॉ. राजीव मराठे यांनी डाळिंब लागवडीविषयी सविस्तर माहिती दिली. नैसर्गिक शेती व सेंद्रिय निविष्ठांचा वापर याविषयी सेंद्रिय शेती करणारी शेतकरी श्री उमेश श्रीधर देशमुख काळेगाव, तालुका. बार्शी आणि श्री अजित ओक हत्तुर,




तालुका. दक्षिण सोलापूर यांनी आपले अनुभव कथन केले. अंतिम सत्रामध्ये माननीय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचे भागलपूर बिहार येथून व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संभाषणाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमासाठी काळेगाव सुरडी, दहिटणे, ढोराळे, पिंपरी. तालुका बार्शी बांगी, हतुर, कंदलगाव, बोरामणी. तालुका. दक्षिण सोलापूर, चुंगी, मोठ्याळ, बोरगाव, साफळे, काजीकंवस, किणीवाडी ता. अक्कलकोट येथील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशेषज्ञ अमोल शास्त्री यांनी तर आभार प्रदर्शन प्रदीप गोंजारी यांनी केले.

# विविध धार्मिक, सामाजिक कार्यासह निरगुडी येथे महाशिवरात्र यात्रा महोत्सवाचे आयोजन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

अक्कलकोट /प्रतिनिधी :

महाराष्ट्र कर्नाटक सीमेवरील आळंद तालुक्यातील निरगुडी येथे जय भारत माता सेवा समिती नवी दिल्लीचे संस्थापक राष्ट्रीय अध्यक्ष तथा राष्ट्रीय संत श्री ॐ हवा मल्लिनाथ महाराज यांच्या दिव्य सानिध्यात महाशिवरात्र यात्रा महोत्सव प्रती वर्षा प्रमाणे यंदाही देश देशभरातील लाखो भाविकांच्या उपस्थित विविध धार्मिक सामाजिक व देशभक्ती कार्यक्रम मोठ्या थाटात होणार आहे.



शिवभक्तांनी आपले जिवन सार्थक करून शिवभक्तीतुन देशभक्ती मार्गाकडे वळावे, म्हणून आंध्रा, कर्नाटका, गुजरात आणि महाराष्ट्र अशा अनेक राज्यासह संपूर्ण देशभरात जय भारतमाता सेवा समितीची शाखा स्थापना केली असून सुमारे साडेसहा हजारोहून अधिक शिवलिंग देवस्थानाची उभारणी केली आहेत. त्यापैकी निरगुडी येथील हे सर्वोच्च देवस्थान असल्याने देशभरातून लाखो भाविकांनी येथे श्रीचे रथोत्सव दर्शन आणि महाप्रसादाची लाभ घेण्यासाठी आवश्य उपस्थित राहतात. दरम्यान बैल, खोंड, गाई सह अनेक जनावराचे गड्डा यात्रा भरविण्यात आला असून बुधुवार दि.२६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्री दिवशी देशभक्तीसह भजन भारूड कीर्तन आदी भरगच्च कार्यक्रम आयोजित केला आहे. रात्री ८ वाजता निरगुडी येथील वें.कै.शंकरय्या स्वामी यांच्या घरातून श्री रेवणसिदेश्वर मल्लिनाथ देवस्थान पर्यंत श्री चे पालखी,नंदिध्वजचे पुरवंतसह विविध वाद्यसमवेत भव्य मिरवणूक काढण्यात येणार आहे. गुरूवार दि.२७ मार्च रोजी आमवशाच्या पहाटे ५ वाजता श्री चे रुद्राभिषेक पूजा, अग्नी पूजा, या नंतर दिवसभर सर्व धर्माचा आणि सर्व पक्षाचा प्रमुख उपस्थिती धर्मसभा कार्यक्रम होणार आहे . दुपारी ४ वाजता श्रीचे रथोत्सव कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे.यानंतर जंगी पैलवानाची भव्य कुस्ती स्पर्धा होणार आहे.दि.२६ व २७ फ ेब्रुवारी रोजी देशभक्ती गीत गायन भजन सह श्रीचे दर्शन सोहळा कार्यक्रम होणार असून या काळात दिवस रात्र सलग महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आला आहे.

# केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांची गौतम विद्यालयाला भेट

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : केंद्रीय सामाजिक न्याय व सक्षमीकरण राज्यमंत्री रामदास आठवले यांनी आज पीपल्स एज्युकेशन सोसायटी, मुंबई संचलित गौतम विद्यालय, पंढरपूर येथे भेट देऊन पाहणी केली.

यावेळी केंद्रीय राज्यमंत्री श्री आठवले यांनी गौतम विद्यालयाची पाहणी करून विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध व आवश्यक सोयी सुविधांची माहिती घेतली. तसेच विद्यालयासाठी प्रस्तावित असणारी १४ कोटीची इमारत लवकरच पूर्ण करण्यात येईल असे सांगितले.



गौतम विद्यालयाची पवित्र भूमी संत गाडगे महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्पर्शाने पावन झालेली आहे.

या भूमीचा विकास करण्याचे ध्येय सर्वच आंबेडकर प्रेमींनी बाळगांव. नगरपालिका प्रशासनाने या ठिकाणी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशा सूचनाही केंद्रीय राज्यमंत्री श्री आठवले यांनी यावेळी दिल्या.

प्रारंभी संत गाडगे महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून संत गाडगे महाराज व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी मुख्याधिकारी प्रशांत जाधव, महात्मा फुले विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष राजाभाऊ सरवदे, आरोग्य निरीक्षक शरद वाघमारे यांच्यासह मान्यवर पदाधिकारी उपस्थित होते.

याप्रसंगी गौतम विद्यालयाच्या वतीने मुख्याध्यापक नंदकुमार वाघमारे यांनी केंद्रीय राज्यमंत्री श्री आठवले यांचा सत्कार केला.



# भारतीय बौद्ध महासभा शाखा सोलापूर तर्फे विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सत्कार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर/प्रतिनीधी : भारतीय बौद्ध महासभा शाखा सोलापूर जिल्हाध्यक्ष कमलाकर कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यागमूर्ती माता रमाई यांची १२७ वी जयंती व संत गाडगे महाराज यांची जयंती वेळोवन बुद्ध विहार शिक्षक सोसायटी मौलाना चौक सोलापूर येथे दि. २३ फेब्रुवारी २०२५ वर रविवारी साजरी करण्यात आली. प्रथमता त्यागमूर्ती माता रमाई परमपूज्य डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर व संत गाडगे महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या हस्ते पुष्पर अर्पण करून सुगंधीत अगरबत्ती व मेणबत्ती प्रज्वलित करून मानवंदना देण्यात आली. भिकुनी यांनी बुद्ध प्रार्थना घेऊन धम्मदेशना दिली. आयुष्यमान दिलीप कदम साहेब, सावताहरी कांबळे साहेब, डॉक्टर हरी सर्वदे डॉक्टर दयानंद सोनवणे सर , एडवोकेट कांबळे मॅडम, शिवशरण मॅडम डॉक्टर एस के गायकवाड साहेब, वैशाली ताई उबाळे मॅडम, आकाश गायकवाड इत्यादींनी आपले मनोगत व्यक्त केले.त्यागमूर्ती माता रमाई यांच्या जयंती निमित्त सामाजिक शैक्षणिक तसेच आरोग्य विषयक क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या महिलांचा सन्मानपत्र फुलगुच्छ देऊन गौरव करण्यात आला.

तसेच कार्यक्रमात सोलापूर जिल्ह्यातील शहर, ग्राम , तालुका कमिटी पदाधिकारी उपस्थित होते. उपासिका वैशालीताई उबाळे यांनी भोजनदान दिले . जिल्हाध्यक्ष कमलाकर कांबळे, जिल्हा उपाध्यक्ष सावता हरी कांबळे जिल्हा संघटक दिलीप कदम, जिल्हा कोषाध्यक्ष रवींद्र कांबळे, उपासीका वैशालीताई उबाळे, डॉक्टर एस के गायकवाड साहेब,अक्कलकोट तालुका अध्यक्ष दत्ता कांबळे श्रीशैल शिवशरण आकाश गायकवाड तसेच मोहोळ तालुका अध्यक्ष प्रवीण साळवे सचिव हरी सरवदे कोषाध्यक्ष डॉक्टर सोनवणे सर विठ्ठल सरवदे तुषार सरवदे मंगल शिवशरण आशा शेंडगे कस्तुराबाई कांबळे वेळूवन बुद्ध विहाराचे चेअरमन तापकिरे सर बौद्ध उपासक उपासिका व सर्व पदाधिकारी मोठ्या संख्येने कार्यक्रमाला उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष कमलाकर कांबळे साहेबांनी भारतीय बौद्ध महासभेचे १० उद्दिस्टे तसेच डॉक्टर भीमराव रामजी आंबेडकर मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह बँकेचे शेअर्स संदर्भात माहिती दिली. व डॉक्टर राजरत्नजी आंबेडकर साहेब यांच्या सुचनेनुसार प्रत्येक घराघरात बौद्ध धम्म पोहोचू आणि त्यांच्या सोबत खंबीरपणे उभा राहू व धम्म वाढविण्यासाठी आमच्याशी संपर्क करावा असे आव्हान केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आयुष्यमान दत्ता कांबळे सर यांनी केले.

तसेच डॉक्टर एस के गायकवाड सरांनी आभार प्रदर्शन केले.

**३२ संघासह ३५० खेळाडूंचा सहभाग**

**महाराष्ट्राचे क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांची प्रमुख उपस्थिती**

# राष्ट्रवादी चषकावर कोरले बारामतीच्या संघाने नाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

इंदापूर प्रतिनिधी : अतुल सोनकांबळे

रविवार दि.२३ फेब्रुवारी २०२५ रोजी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी आयोजित राष्ट्रवादी चषक २०२५ या क्रिकेट स्पर्धेचा समारोप महाराष्ट्र राज्याचे क्रीडा युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास मंत्री आदरणीय श्री दत्तात्रय भरणे (मामा) यांच्या उपस्थितीत झाला. ही स्पर्धा दि. १९ फेब्रुवारी पासून तब्बल ५ दिवस चालू होती. ३२ संघ, ३५० खेळाडूंचा सहभाग, भव्य दिव्य मैदान, वैद्यकीय सेवा, भरघोस रोख बक्षिसे, युट्यूब लाईव्ह, उत्कृष्ट नियोजन या वैशिष्ट्यांसह ही स्पर्धा यशस्वीपणे पार पडली.



यावेळी प्रथम बक्षीस ७७,७७७ व ट्रॉफी हे यंगर्स एलेव्हन बारामती यांनी, द्वितीय बक्षीस ५५,५५५ व ट्रॉफी हे नवनाथ धांडोरे इलेव्हन वालचंदनगर संघाने, तृतीय बक्षीस ३३,३३३ व ट्रॉफी नातेपुते संघाने तर चतुर्थ बक्षीस २२,२२२ व ट्रॉफी हे पिनु झेंडे इलेव्हन वालचंदनगर या संघाने जिंकले.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट तथा क्रीडा युवक कल्याण व अल्पसंख्याक विकास मंत्री दत्तात्रय भरणे, राष्ट्रवादी काँग्रेस चे प्रदेश प्रवक्ते डॉ. शशीकांत तरंगे, राष्ट्रवादी चे जेष्ठ नेते प्रतापआबा पाटील, पुणे जिल्हा नियोजन समितीचे सदस्य सचिन सपकळ, नेचर डिलाईट डेअरी चे कार्यकारी संचालक डॉ. ज्योतीराम देसाई, राष्ट्रवादी चे युवा नेतृत्व तथा उद्योगपती विनोद गांधी,देसाई हॉस्पिटल चे एम.डी. डॉ.बाबासाहेब कांबळे, साद फाऊंडेशन चे संस्थापक अध्यक्ष सुरजभैय्या वनसाळे,कळंब चे प्रथम नागरिक अतुल सावंत,प्रा.अशोक वाघमोडे सर ,लासुर्णे चे ग्रामपंचायत सदस्य संतोष (पिपा)लोंढे, प्राथमिक आरोग्य केंद्र लासुर्णे चे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रथमेश कदम, डॉ. मारूती हिंगणे पाटील, लासुर्णे चे सामाजिक कार्यकर्ते महेश लोंढे, राष्ट्रवादी चे शेखर काटे, बाबा गायकवाड,वालचंदनगर चे सामाजिक कार्यकर्ते मुन्ना झेंडे, इंदापूर तालुका युवा सेनेचे मिलिंद साबळे, महेश रूपनवर, हे उपस्थित होते. या स्पर्धेत पंच म्हणून किरण मिसाळ, युनुस पठाण,



डॅनी कांबळे यांनी काम पाहिले. या स्पर्धेचे उद्घाटन १९ फेब्रुवारी रोजी राष्ट्रवादी चे तालुका अध्यक्ष हनुमंतआबा कोकाटे, छत्रपती चे व्हाईस चेअरमन अमोल पाटील, वालचंदनगर पोलीस स्टेशन चे सहाय्यक पोलीस निरीक्षक राजकुमार डुणगे, लासुर्णे चे सरपंच सागर पाटील, डॉ. तन्मय पहलानी, सुजल विनोद गांधी व अनेक मान्यवरांच्या हस्ते झाले होते.

हि स्पर्धा यशस्वी करण्यासाठी स्पर्धेचे मुख्य आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे सरचिटणीस क्षितीजदादा वनसाळे, संतोष तोरणे, मिथुन खरात, बी एम कांबळे सर, सदाशिव सुर्यगंध सर व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी मेहनत घेतली.

# कोरेगाव भिमा चौकशी आयोग पुणे समोर यश सिद्धी बहुउद्देशीय असोसीएशनने दिली साक्ष

## स्थानिक प्रशासनाच्या कायदेशीर परवानगी घेवून मागील चार वर्षांपासून शौर्यदिन साजरा

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पुणे : यश सिद्धी आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य हे महार रेजिमेंटचे राज्य स्तरावर रजिस्टर्ड असोसिएशन आहे . ज्यामध्ये १२ हजार महार रेजिमेंटचे सैनिक जुडलेले असून ाा, छर्ाूं, ळी षैलश व ईतर मिलट्री फोर्समधुन सेवानिवृत झालेले सैनिक सदरील असोसिएशन मध्ये सामील झालेले आहेत. तसेच मोठ्या संखेने कायदेशीर सभासद नोंदणीसह सैनिक ह्या मधे सामील होत आहेत. यश सिद्धी बहुउद्देशीय असोसिएशनने राज्यस्तरावर भिमा कोरेगाव येथे सैनीकांच्या सहभागातून आर्थिक खर्च करून जिल्हाधिकारी पुणे, लोणीकंद पोलीस स्टेशन, अधिकारी तसेच भिमा कोरेगांव येथील स्थानिक प्रशासनाच्या कायदेशीर परवानगी घेवुन मागील चार वर्षांपासून शौर्यदिन साजरा करीत आहेत .



१ आक्टोबर २०२३ रोजी अमरावती तसेच १ आक्टोबर २०२४ रोजी पिंपरी चिंचवड ( पुणे ) येथे महार रेजिमेंटचा राज्य स्तरावर रेजिंग ' डे ' चे येशस्वी रित्या कार्यक्रम घेतलेले असून. महाराष्ट्रात ठिकठीकाणी जिल्ह्यात संविधान दिवस कार्यक्रम घेऊन संविधानाबद्दल जनजागृती केली आहे. तसेच महाराष्ट्रातील विविध ठिकाणी रक्तदान शिबीर, शारीरीक तपासणी शिबीर, भरती पूर्व प्रशिक्षण मार्गदर्शन शिबीर आयोजित केली आहेत. समाज सेवा सह महार रेजिमेंटचे समुहीक प्रश्न जसे महार रेजिमेंट ट्रेनिंग सेंटर सागर (म .प्र.) मध्ये महार रेजिमेंट चे संस्थापक डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे स्मारक बनवीने, बुद्ध विहार बनविने तसेच महार रेजिमेंट मध्ये महाराष्ट्रीतील युवकाकरीता ८० टक्के भरती करणे व ईतर महार रेजिमेंटच्या समस्यावर काम करत आहे. तसेच महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर जन्म ठिकान महु (आताचे आबेंडकर नगर) तसेच चैत्यभुमी दादर मुंबई येथे मागील ४ वर्षापासून संटनेच्या वतीने सर्व सैनिकासह मानवंदना देत आहेत.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी १ जानेवारी १८१८ च्या भिमा कोरेगाव रणसंग्रामाच्या प्रेरणेवरून १आक्टोबर १९४१ रोजी तात्कालीन ब्रिटीश सरकार सोबत मोठा संघर्ष करून महार रेजिमेंट ची स्थापन केली. तात्कालीन ब्रिटीश सरकारने ५०० शुरविर महारांच्या सन्मानार्थ कोरेगांव येथे भिमा नदीच्या काठावर ७५ फुट उंच विजयस्तंभ १३ मार्च १८२४ रोजी उभारला आहे. १ जानेवारी १९२७ ला महा मानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी शिवराम जानबा कांबळे यांच्या विनंती वरून भिमा कोरेगांव शौर्य स्तंभास मानवंदना दिली होती. भिमा कोरेगांव विजय स्तंभ महार रेजिमेंट चे प्रेरणा स्थान असल्यामुळे १९४१ ते ४७ पर्यंत विजयस्तंभ महार रेजिमेंटच्या लोगो मध्ये होता त्यामुळे विजय स्तंभ व महार रेजिमेंट सैनिकांचे नाते एक आई व मुलाप्रमाणे आहे. म्हणूनच महार समाज (आताचे बौद्ध) व बहुजन समाजाचे लोक १ जानेवारी रोजी लाखोच्या संखेने महार रेजिमेंटच्या सैनिकासह भिमा कोरेगाव शौर्य स्तंभाला अभिवादन करण्यासाठी येतात. परंतु तेथे जागे अभावी महार रेजिमेंट चे सैनिक व भिम अनुयायी ची गैरसोय होते. महाराष्ट्र सरकार दर वर्षी १ जानेवारी शौर्य दिन कार्यक्रमासाठी लाखो रुपय खर्च करून अस्थाई स्वरुपात व्यवस्थापन करत आहे. परंतु कोरेगांव भिमा स्तंभाची गट नं. १०३३, क्षेत्रफळ ३ हेक्टर १० आर जागा असुन सदरील जागेवर अतिक्रमण झाल्यामुळे न्यायालयात प्रकरण प्रलंबित आहे. दि. २२ फेब्रुवारी २०२५ रोजी यश सिद्धी आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसिएशन महाराष्ट्र राज्य या असोसिएशनने कोरेगांव भिमा चौकशी आयोग समोर सदरील असोसिएशनचे राज्य सचीव श्री कैलास खिल्लारे साहेब यांनी सविस्तर साक्ष देवून वरील प्रमाणे केलेल्या कार्यक्रमांचे कागदोपत्री पुरावे मा.उच्च न्यायालय मुंबईचे ॲड.आदरणीय बि. जी. बनसोडे साहेबांच्या वतीने सादर केले तसेच अँड.बि.जी.बनसोडे साहेबांनी सदरील असोसिएशनच्या वतीने आयोगा समोर भक्कम बाजु मांडली व भिमा कोरेगांव व्यवस्थापना साठी महाराष्ट्र सरकारणे यश सिध्दी आजी माजी सैनिक बहुउद्देशीय वेल्फेअर असोसीएशन महाराष्ट्र राज्य ची नियुक्ती करावी परंतु विजय स्तंभाचे मेटेनंस व दर वर्षी होणाऱ्या शौर्य दिनासाठी लागणारा खर्च हा महाराष्ट्र शासनाने करावा. तसेच पुणे येथे पोस्टिंग असलेल्या महार रेजिमेंट च्या १ प्लाटून /सेक्शन ची हाथीयार सह विजय स्तंभाच्या सुरक्षेसाठी नियूक्ती करावी. अशी असोसिएशनच्या विनंती कोरेगांव भिमा चौकशी आयोगासमोर विनंती केली आहे. सदरील विनंती बाबत कोरेगांव भिमा चौकशी आयोगाने सदरील बाबीचा सकारात्मक विचार करून आयोगामार्फत महाराष्ट्र सरकार समोर मांडुन सदरील असोसिएशन ची नियुक्ती करण्यासाठी प्रयत्न केला जाईल अशी माहीती असोसिएशनचे राज्यसचीव श्री कैलास खिल्लारे मेजर यांनी माहिती दिली. राज्य स्तरीय असोसिएशनच्या वतीने ॲड.बि .जी. बनसोडे साहेबांनी काम पाहिले .

आयोगा समोर सुनावनीच्या वेळी खालील प्रमाणे उपस्थिती होती. असोसिएशनचे अध्यक्ष सुभेदार प्रदीप गायकवाड, उपाध्यक्ष शिवपुत्र घटकांबळे, राज्य सचीव श्री कैलास खिल्लारे, मार्गदर्शक कॅबाबु पोळके . सुभेदार संतोष वानखेडे, शामराव भोसले, सुभेदार पोपट अल्हाट, कॅभगवान हिंगोले, सुबे.मेजर शिवाजी जेगझाप, सुभेदार विश्वनाथ जाधव, इश्वर, बनसोडे, बुद्धा चव्हाण, प्रवक्ता गजान इंगळे, ॲड.राजेंद्रकुमार खोब्रागडे, जगन कांबळे, प्रमोद जाधव, श्रीकांत झेंडे, गोरखनाथ गायकवाड, गुलाब गायकवाड, सुभेदार रेवनसिद्ध सोनकांबळे, गौतम भालेराव, प्रमोद गायकवाड, रविकांत कांबळे, अशोक जगझाप, कॅप्टन सुभाष कंकाळ असे महाराष्ट्रातील सैनिक उपस्थित होते.

## थोडक्यात...

### डॉल्बीच्या आवाजाने कानाच्या नसा कमकुवत ; मंडळातील पदाधिकाऱ्यांसह डॉल्बीधारकावर गुन्हा

सोलापूर, (प्रतिनिधी) : डॉल्बीच्या आवाजाने त्रास होऊन कानाच्या नसा




कुमकुवत होऊन काही ऐकू येत नसल्याची फिर्याद राजू दत्तू यादगिरीकर (वय-५८,रा.शेरखान वस्ती,कोयनानगर,देगाव रोड) यांनी सलगर वस्ती पोलीस ठाण्यात दिली असून, त्यांच्या फिर्यादीवरून बी जी ग्रुपच्या मंडळातील पदाधिकारी व डॉल्बी धारक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल झाला आहे.हि घटना १८ फेब्रुवारी रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास शेरखान वस्ती येथे घडली. या घटनेची हकीकत अशी की, फिर्यादी यांच्या घरासमोर वरील मंडळांनी डॉल्बी लावल्याने त्याचा आवाज खूप मोठा असल्याने फिर्यादीस त्रास होऊ लागला. त्यावेळी फिर्यादी यांनी मंडळाजवळ जाऊन मंडळातील लोकांना डॉल्बीचा आवाज कमी करा असे सांगत असताना देखील डॉल्बीचा आवाज कमी केला नाही. डॉल्बीच्या आवाजामुळे फिर्यादी यांच्या दोन्ही कानाच्या नसा कुमकुवत होऊन ऐकू येत नसल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.या घटनेचा पुढील तपास पोलीस हेडकॉन्स्टेबल उपासे हे करीत आहेत.

# महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग दारुबंदी पोलीसपदी प्रवीण करमले यांची निवड

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : प्रवीण सिद्राम करमले माझा भाचा महाराष्ट्र राज्य उत्पादन शुल्क विभाग दारुबंदी पोलीस म्हणून निवड झाल्याबद्दल यांचे अभिनंदन करून सत्कार करण्यात आला. यावेळी युवा भिमसेना संपर्क कार्यालय येथे युवा भिमसेना सं अध्यक्ष पंकज भाऊ काटे, प्रवक्ते सोफी भाई, सय्यद युवा जिल्हाध्यक्ष शेखर कांबळे, पुणे जिल्हा संपर्कप्रमुख आश्रुबा कांबळे, महिला जिल्हाध्यक्ष उमाताई आदमने, मराठवाडा अध्यक्ष कुणाल इंगळे, शहराध्यक्ष अजय कांबळे, शहर कार्याध्यक्ष अँड सुनील मस्के, विशाल भाऊजी भोसले, बाबा गायकवाड, धम्मा कांबळे, महेंद्र मोरे, माने सर,




शिरीष मांदळे, श्रीकांत करमले, सागर कांबळ, संदीप करमले, शरद सरवदे, अक्षय गडेराव, बाळू गायकवाड, धनराज कांबळे इतर पदाधिकारी व कार्यकर्ते मित्रपरिवार पत्रकार बांधव उपस्थित होते.

# किनीनवरे येथे अखंड हरिनाम सप्ताहाला सुरुवात

**भागवताचार्य ह.भ.प परमेश्वरी दीदी परभने यांच्या सुश्राव्य वाणीतुन भाविकांसाठी भागवत कथेची पर्वणी**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा : औसा तालुक्यातील किनीनवरे येथे गेल्या ४२ वर्षापासुन पारंपारीक चालत असलेला अखंड हरिनाम सप्ताह साजरा केला जातो ,किनीनवरे येथील सप्ताह निमीत्त गावात प्रति पंढरपुर प्रमाने भाविकांनी किनीनवरे गाव गजबजुन जाते व भक्तीमय वातावरणात सर्व गावकर्यांच्या वतिने सुसज्य नियोजनात व भक्तीमय वातावरणात सप्ताह साजरा करण्यात येतो. या सप्ताहात काकडा. ज्ञानेश्वरी पारायण, भागवत कथा, व नामांकीत किर्तनकाराच्या सुश्राव्य वाणीतुन किर्तनाचे आयोजन करण्यात येते .भागवतकथा निमीत्त श्रीकृष्ण जन्मोत्सव सोहळा साजरा करण्यात आला.

यावेळी गावातील महिलांनी पाळण्यात बाळ कृष्णाचे नामकरण करुन एकमेकांना सुटवडा भरवत पाळणे गायले, किनीनवरे येथील प्राजक्ता शिंदे व लखन शिंदे या दांपत्याचे गुणी बाळ शर्विल या




चिमुकल्याला श्रीकृष्ण भुमीकेत पाहुन अनेकांनी कौतुकाचा वर्षाव केला व या बाल कृष्णाने सर्वाची मने जिंकली. यावेळी लातुर येथील न्युरो सर्जन डॉ. हनमंत किनीकर, ॲड किरण जाधव, जिल्हा परीषद सदस्या संगीता शिंदे, माधव भिसे, चेअरमन सतीश मरुरे, सरपंच अदिनाथ जाधव, उपसरपंच हिरा किनीकर, भिमा शिंदे, श्रीमंत जाधव, ज्ञानदेव जाधव, ज्ञानेश्वर जाधव, राम जाधव, तुकाराम गायकवाड, तानाजी गीरी, मोहन शिंदे, प्रतिक पाटील, दाजीबा किनीकर, ज्ञानेश्वर किनीकर, मचिंद्र गिरी सह किनीनवरे गावातील ग्रामस्थ उपस्थीत होते.

# होपमिरर फाउंडेशनच्या वतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिर

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव : छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त होपमिरर फाउंडेशनने बाळासाहेब ठाकरे लॉ कॉलेज आणि अपोलो हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाचे उद्घाटन बाळासाहेब ठाकरे विधी महाविद्यालयाचे अध्यक्ष बबनदादा पाटील यांच्या हस्ते करण्यात आले, ज्याचा उद्देश आरोग्य विषयक जागरूकता वाढवणे आणि समाजाला मोफत वैद्यकीय सल्ला देणे हा आहे. या शिबिरात आरोग्याच्या विविध बाबींचा समावेश करण्यात आला.होपमिरर फाऊंडेशनचे संस्थापक रमझान शेख यांनी संस्थेच्या आणि आरोग्य शिबिराच्या अंमलबजावणीबद्दल प्रचंड समाधान व्यक्त केले. त्यांनी विधी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची उच्च उपस्थिती आणि संस्थेच्या बाहेरील अभ्यागतांची लक्षणीय उपस्थिती बद्दल आभार मानले ज्यांनी विनामूल्य तपासणीचा लाभ घेतला. रमझान शेख यांनी सर्व स्वयंसेवकांचे आणि अपोलो हॉस्पिटलच्या टीमचे त्यांच्या पाठिंब्याबद्दल मनापासून आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली. विधी महाविद्यालयाच्या प्रिन्सिपल वैशाली बोराडे, तसेच राहुल कांबळे, हमीदा अन्सारी, रशु नायर, अमजद शेख यांचे मनापासुन आभार मनाले. तसेच सहाय्यक स्वयंसेवक गौरव खांडेकर, आरुष




अग्रवाल, ध्रुव चौहान, सार्थक तेंदुलकर, लावण्या खुराना, रेयांश सोनी, सौम्या सर्वैया आणि उर्मी राणा यांचे ही आभार मानले ज्यांच्या समर्पण आणि परिश्रमाने आरोग्य शिबिर यशस्वी झाले.

**पुणे जिल्ह्यातील एकाच वेळी ४२ ठिकाणी 'स्वच्छ जल-स्वच्छ मन' अभियान संपन्न**

**'अमृत प्रोजेक्ट' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन'अभियानाच्या तिसऱ्या टप्प्याचे आयोजन विश्वभरात**



# ओतूर येथील मांडवी नदी परिसर निरंकारी स्वयंसेवकांनी केला स्वच्छ

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ओतूर प्रतिनिधी/मनोज तांबे : सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन आशीर्वादाने २३ फेब्रुवारी २०२५ ची स्वर्णिम प्रभात एक नवीन जागृती व सेवेच्या दिव्य प्रकाशाचा संदेश घेऊन आली ज्यामध्ये 'अमृत प्रोजेक्ट' अंतर्गत 'स्वच्छ जल, स्वच्छ मन'अभियानाच्या तिसऱ्या टप्प्याचे आयोजन विश्वभरात केले गेले.

या अभियाना अंतर्गत ओतूर येथील मांडवी नदी व कपर्दिकेश्वर मंदीर परिसर शेकडो निरंकारी स्वयंसेवकांनी संपूर्ण परिसर चकाचक केला. या अभियानासाठी कपर्दिकेश्वर देवधर्म संस्थेचे अध्यक्ष अनिल तांबे, मा.जि.सदस्य शरदराव लेंडे,महेंद्र पानसरे, शांताराम वाकर आदी मान्यवर उपस्थित होते. ग्रामपंचायत कार्यालय ओतूर यांचे विशेष सहकार्य मिळाले. तसेच पुणे जिल्ह्यातील इंद्रायणी, मुळा, मुठा, भीमा, भामा, घोडनदी, पवना, वेळू, कुकडी, मिना, कऱ्हा, मांडवी, आनंदी या नद्यांसह शहरातील विविध तलाव अशा ४२ ठिकाणी ही मोहीम राबविण्यात आली. ज्यामध्ये ओंकारेश्वर नदी घाट, कात्रज तलाव, आळंदी-देहू-चऱ्होली येथील इंद्रायणी नदी घाट, मोरया गोसावी मंदिराचा पवना नदी घाट आदी प्रमुख जलस्रोतांची स्वच्छता करण्यात आली ज्यामध्ये हजारो निरंकारी सेवादल स्वयंसेवक व भाविक भक्तगणांनी मोठ्या उत्साहाने भाग घेतला अशी माहिती मिशनचे पुणे जिल्हा प्रभारी ताराचंद करमचंदानी यांनी दिली.

संत निरंकारी मंडळाचे सचिव व समाज कल्याण प्रभारी श्री.जोगिंदर सुखीजा यांनी माहिती देताना सांगितले, की देशभरात राबविलेल्या 'अमृत प्रोजेक्ट' परियोजनेच्या दरम्यान सर्व सुरक्षा नियमांचे पूर्णपणे पालन करण्यात आले. युवावर्गाचा विशेष सहभाग हा अभियानाचा मुख्य आधार होता. त्यांनी हेही सूचित केले, की ही मोहीम केवळ एका दिवसापुरती सीमित नाही तर दरमहा विविध घाट व जलस्रोतांची स्वच्छता निरंतर चालू राहील. संत निरंकारी मिशनची सामाजिक शाखा, संत निरंकारी चॅरिटेबल फाऊंडेशनच्या विद्यमाने, पूज्य बाबा हरदेवसिंहजी महाराज यांच्या असंख्य दिव्य शिकवणूकींतून प्रेरणा घेत या पावन अभियानाचे आयोजन करण्यात आले.२७ राज्ये व केंद्रशासित प्रदेशातील १६५० पेक्षा अधिक ठिकाणी १० लाखांहून अधिक संख्येने सेवाभावनेने ओतप्रोत स्वयंसेवक भक्तगणांनी संपूर्ण देशामध्ये एकाच वेळी हे महान अभियान साकारले.हे दृश्य केवळ प्राकृतिक स्वच्छतेपर्यंत सीमित न राहता, अंतर्मनाला निर्मळ आणि पवित्र करण्याऱ्या एका आध्यात्मिक यात्रेचे सुंदर प्रतीक बनले.प्रत्येक श्रद्धाळु भक्ताची समर्पित उपस्थिती या गोष्टीचे प्रमाण होते, की जेव्हा प्रेम, सेवा आणि समरसतेचा दिव्य संगम होतो तेव्हा प्रकृतीही नवजीवनाचा अनुभव घेते.

सतगुरु माताजींनी पाण्याचे महत्व अधोरेखित करताना समजावले,की पाणी अमृतासमान आहे जे प्रकृतीने आपल्याला सर्वोत्तम उपहाराच्या रुपात प्रदान केले आहे. त्याची स्वच्छता आणि संरक्षण ही केवळ एक जबाबदारीच नव्हे तर आमची स्वाभाविक सवय बनून गेली पाहिजे.बऱ्याचदा आपण अजाणतेपणे आपण वापरा व फेकून द्या अशा वस्तू व घाण जलस्रोतांमध्ये टाकून प्रदूषणात भर घालत असतो ज्यामुळे पर्यावरणाची हानी होते. याच चिंतनातून प्रेरित होऊन 'प्रोजेक्ट अमृत' सारख्या सामाजिक उपक्रमाची सुरुवात करण्यात आली आहे जी जल संरक्षण आणि स्वच्छतेच्या प्रति जागरुकता पसरविण्याचा एक महत्वपूर्ण प्रयास आहे.

बाबा हरदेवसिंहजी यांच्या जन्मदिवसाला समर्पित असलेल्या या पवित्र सेवा अभियानात प्रत्येक भक्ताला जल संरक्षणाच्या दिशेने योगदान देण्याची संधी मिळाली.हा पुढाकार केवळ घाट आणि जलस्रोतांच्या स्वच्छतेवर केंद्रीत नसून घरांमध्येही लहान-सहान सवयीतून जल बचतीला प्रोत्साहित करत आहे ज्यायोगे पाण्याचा आदर व्हावा आणि हे अमूल्य संसाधन भविष्यातील पिढ्यांसाठी सुरक्षित राहू शकेल.

पर्यावरण सुरक्षा अंतर्गत जल संरक्षणामध्ये आपली सकारात्मक सक्रिय भूमिका निभावत ग्लोबल एनर्जी न्ड एन्व्हायरनमेंट फाउंडेशन (GEEF) ने संत निरंकारी चॅरिटेबल फाउंडेशनला (SNCF) प्रतिष्ठित 'वाटर कंजर्वेशन इनिशिएटिव्ह एनजीओ ऑफ द ईयर २०२५' पुरस्कार देऊन गौरविले आहे. हा गौरवपूर्ण सन्मान डछउऋच्या प्रोजेक्ट अमृत-स्वच्छ जल, स्वच्छ मन आणि त्यातील विविध जल संरक्षण व स्वच्छतेसाठी घेतलेल्या पुढाकाराच्या प्रति अथक समर्पणाचे प्रतीक आहे. नि:संशय जल संसाधनांची शुद्धता आणि सतत संरक्षण करण्यामध्ये डछउऋ द्वारे केले जाणारे प्रयास समाजाला स्वच्छ,स्वस्थ आणि समृद्ध भविष्याकडे अग्रेसर होण्यामध्ये महत्वपूर्ण भूमिका निभावत आहेत.